PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 4, ISSUE 3

आष्टीच्या लढ्यातील खडकी गावातील महिलांची कामगिरी - एक दृष्टिक्षेप

डॉ. प्रकाश ध. पवार

इतिहास विभाग प्रमुख

अरविंदबाबू देशमुख महाविद्यालय

भारसिंगी तह- नरखेड जि. नागपूर

महाराष्ट्र भारत

सारांश:-

ब्रिटिश सत्तेच्या जोखंडातून भारताला स्वतंत्र करण्यासाठी इ.स १९४२ मध्ये 'चले जाव' वा 'छोडो भारत' आंदोलनाच्या माध्यमातून काँग्रेसच्या नेतृत्वात भारतीयांनी जोरदार लढा दिला. या लढ्यात गरीब-श्रीमंत,शहरी-ग्रामीण,पुरुष-महिला,लहान-मोठे अशा सर्वांनीच उत्स्फूर्तपणे सहभाग दिला. त्यामुळेच भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात १९४२ च्या आंदोलनाला अनन्यसाधारण महत्व आहे.

विदर्भातील आष्टी,चिमूर व यावली येथील स्वातंत्र्यलढे संपूर्ण भारतभर गाजले.वर्धा जिल्ह्यातील आष्टी या गावात जो स्वातंत्र्यसंग्राम घडून आला तो खऱ्या अर्थाने त्या परिसरातील शूर महिलांच्या कर्तृत्वाचा इतिहास आहे. आष्टी तालुक्यातील खडकी नदीच्या खडकाळ पात्रात वसलेल्या खडकी या गावाच्या महिलांनी १९४२च्या आष्टी येथील छोडो भारत आंदोलनात महत्वाची कामगिरी बजावली.

प्रस्तावना

१४ जुलै १९४२ रोजी वर्धा येथे काँग्रेस कार्यकारिणीने पारित केलेल्या 'छोडो भारत' ठरावावर ८ ऑगस्टला मुंबईत ग्वालिया टैंक मैदानावर झालेल्या काँग्रेसच्या बैठकीत

शिक्कामोर्तब करण्यात आले परंतु ९ ऑगस्ट रोजी सकाळीच ब्रिटिश सरकारने महात्मा गांधी सह काँग्रेस श्रेष्ठींना अटक केली. ही बातमी संपूर्ण देशभर पसरताच 'छोडो भारत' आंदोलनाला प्रारंभ झाला. वर्धेच्या गोविंदराम सक्सेरिया महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आष्टी परिसरातील गावांमध्ये गांधीजींचा संदेश घरोघरी पोहोचविला. १२ ऑगस्टला तुकडोजी महाराजांनी आष्टी परिसरात येऊन तेथील जनतेला स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होण्यासाठी मार्गदर्शन केले.त्यांनी लोकांची मने जागृत करून राष्ट्रकार्यासाठी प्रेरित केली. खडकि,सीरसोली या गावातील लोक क्रांतिकार्यासाठी पुढे सरसावले त्यामध्ये खडकीतील महिलांचा उत्साह अतुलनीय होता खडकी गावातील ३० ते ४० महिलांनी आष्टी चा स्वातंत्र्यलढा अजरामर केला.

शोधनिबंधाचे उद्देश

१) आष्टीच्या स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचे योगदान स्पष्ट करणे.

२) आष्टीच्या लढ्यातील खडकी गावातील महिलांच्या कामगिरीचे विश्लेषण करणे.

३) आष्टीच्या लढ्यातील खडकीच्या महिलांचा सहभाग व भूमिका विशद करणे.

संशोधन पद्धती व साधने

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला असून प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करून हा शोधनिबंध पूर्णत्वास आलेला आहे.

विषयाचे महत्त्व

आष्टीच्या पोलीस ठाण्यावर १७ ऑगस्टला सत्याग्रह करण्याचे निश्चित झाले. आजूबाजूच्या गावात तशी प्रचार पत्रके वाटण्यात आली. ताबडतोब खडकीत पाटील व पटवारी यांच्या दप्तरांना आगी लावण्यात आल्या. परंतु १६ ऑगस्टला नियोजित तारखेपूर्वी आष्टी परिसरातील लोकांनी पोलीस ठाण्यावर मिरवणूक नेली. तेथे राष्ट्रीय ध्वज फडकवणे व शासकीय कागदपत्रे नष्ट करणे हा सत्याग्रहींचा प्रमुख उद्देश होता. दरम्यान पोलिसांनी एका

आंदोलक नेत्याला पकडून बंदिस्त केले. त्यामुळे आंदोलनाला हिंसक वळण लागले. आंदोलन कर्त्यापैकी डॉक्टर मालपे मागच्या बाजूने शिरून पोलीस ठाण्यातील कागदपत्रे हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. ते पोलीस उपनिरीक्षक मिश्रांच्या नजरेस पडतात त्याने हवालदाराच्या गोळीबाराचा आदेश दिला. त्यामध्ये ७ आंदोलक जागीच ठार झाले अनेकांना जखमी अवस्थेतही तुरुंगात डांबण्यात आले. आष्टीच्या सत्याग्रहाकरीता पुरुष बरोबरच खडकी गावातील ३० ते ४० महिला कासाबाई शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भगोती नदीपर्यंत येऊन पोहोचल्या. त्याच प्रमाणे सीरसोली,नरसापुर या गावातील सत्याग्रही येथे येऊन पोहोचले तेव्हा आष्टीला भयंकर रणकंदक झाल्याची बातमी रामकृष्ण जामदे यांनी सत्याग्रहींना दिली अशावेळी खडकीच्या महिलांचा जत्था अहिल्याबाई नागपुरे,कलावतीबाई नागपुरे,अन्नपूर्णाबाई नागपुरे,विठाबाई शिंदे तसेच कौशल्याबाई व गंगुबाई 'छोडो भारत' चा नारा देऊन सत्याग्रही मध्ये उत्साह जागवित होत्या. परंतु सत्याग्रहा करिता आलेले काही लोक भयभीत होऊन आपापल्या गावी परत जाण्याची भाषा बोलू लागले. तेव्हा कासाबाई शिंदे खडकी चा रस्ता अडवून उभी राहिली व मोर्चाला उद्देशून म्हणाली,"तुम्हाला जर परत जायचे आहे तर तुम्ही मोर्चात आलेत कशाला ? ज्यांना घरी जायचे असेल त्यांनी खुशाल निघून जावे. परंतु जाण्यापूर्वी आपले कपडे उतरवून आमचे महिलांचे कपडे घाला व घरी गेल्यावर आमच्यासाठी स्वयंपाक करून ठेवा." कासाबाई चे हे उद्‌गार ऐकून मोर्चेकऱ्यांनमधील पुरुषार्थ जागृत झाला व तेथून कोणीही परत घरी गेला नाही. ती सर्व मंडळी उत्साहपूर्वक भारत मातेच्या जय जय कार करीत तुकडोजी महाराजांची भजने गात आष्टीत पोहोचले. खडकी चे गुलाबराव वाघ आष्टीच्या पोलीस उपनिरीक्षकास म्हणाले पोलीस ठाण्याचा आवाराचे फाटक कृपया उघडा आम्हाला जखमी लोकांना दवाखान्यात न्यायचे आहे ,त्यांना पाणी द्यावयाचे आहे . त्यावर उपनिरीक्षक मिश्रा उदगारला, 'उन्हे हम कुत्तो का मूत पीलायेंगे वे शहीद नही कुत्ते है.' हे ऐकताच गुलाबराव वाघ यांनी उपनिरीक्षकाच्या दिशेने उडी मारली तेव्हा उपनिरीक्षक मिश्राने गोळी झाडण्यास प्रारंभ केला. या गोळीबाराचे प्रतिउत्तर म्हणून खडकीच्या सत्याग्रही महिला दगड गोळा करायला लागल्या. हजारो दगडांचा वर्षाव उपनिरीक्षकाच्या दिशेने होऊ लागला. उपनिरीक्षकाची एक गोळी अहिल्याबाई नागपूरेच्या दंडाला लागली. अशाही अवस्थेत ती दगड जमा करीत 'मारा झोडा' असे मोठ्याने ओरडत राहिली. आष्टीत गोळ्यांचा वर्षाव सारखा सुरू होता अशावेळी एक गोळी खडकीच्या हिरालाल नावाच्या १८ वर्षाच्या मुलाला लागली तेव्हा

खडकीच्या कासाबाई,गंगुबाई,मंजुळाबाई इ यांनी त्याला सावरण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु तेथे तो धारातीर्थ पडला आता गोळ्यांचा वर्षाव महिलांच्या दिशेने होऊ लागला. त्यातील एक गोळी कासाबाई शिंदेंच्या उजव्या हाताला लागलेली पाहून मंजुळाबाई धावत आली. तेव्हा कासाबाई जोराने ओरडली, 'माझ्याकडे बघून माघार घेऊ नका' त्याच वेळेस मंजुळाबाई च्या कानाला एक गोळी लागली अहिल्याबाई नागपूर यांच्या दंडा खाली एक गोळी लागून तिथे रक्त सांडू लागले. तेव्हा पोलिसांना ती म्हणाली, "अरे दुश्मनांनो आया-बहिणींवर गोळ्या घालताना तुम्हाला लाज वाटत नाही का? तुमच्या बायकांवर गोटमार करून त्यांना मारले तर तुम्हाला कसे वाटेल?" अहिल्याबाईच्या या वाक्याने पोलीस घाबरले त्याच्या बंदुकीतील गोळ्या ही संपल्या या वेळी महिलांच्या गोट मारी ने उग्ररूप धारण केले अहिल्याबाईंच्या डरकाळीने पोलीस चरकले आणि उपनिरीक्षकास एकटे सोडून शिपाई पळून गेले. तात्काळ उपनिरीक्षक मिश्रा एकटा पडलेला पाहून महिला सत्याग्रहींनि दगडांच्या माऱ्याने त्याला जागच्या जागी ठार केले. शिवाय दोन शिपाई लाकडाच्या गंजीत लपून बसले आहे असे कळताच या महिलांनी त्या गंजीला आग लावून त्यांनाही पेटवून दिले.

आष्टीतील पोलिसाच्या हत्याकांडाचा बदला घेण्यासाठी ब्रिटिश सरकारने २५ ऑगस्टला खिडकीत लष्कर रवाना केले. खडकीच्या झेंडा मैदानातील देऊळ परिसरात मोठमोठी भांडी दगडांनी भरून ठेवलेली होती. खडकीतील पंचवीस महिला विठाबाई शिंदे यांच्या नेतृत्वाखाली गळ्यात गोफणी अडकवून उभ्या राहिल्या. लष्कराचे आगमन खडकीत होताच खडकीतील सर्व लोक महिलांसह मैदानात गोळा झाले . लष्करी अधिकाऱ्याने जवळ आरोपी म्हणून खडकीतील 11 पुरुष व दोन महिलांची यादी होती. त्या दोन महिला म्हणजे कासाबाई शिंदे व अहिल्याबाई नागपुरे या होय.

कासाबाई शिंदे झेंड्याच्या चबूत्र्यावर उभ्या राहून झेंड्याचे रक्षण करीत होत्या. तेव्हा मॅजिस्ट्रेट ने, 'हठ जाओ वहा से' असा आदेश दिला. तेव्हा कासाबाईने उत्तर दिले की, 'मला मारल्याशिवाय तुम्हाला झेंडा काढता येणार नाही.' कासाबाई ने एकटीने 500 शिपायापासून ध्वजाचे रक्षण केले. अशा परिस्थितीत काही गडबड झाल्यास खडकीच्या महिलांनी गोट मारी ची पूर्ण तयारी आधीच करून ठेवली होती. त्याची चाहूल लष्कराला पूर्वीच लागली असल्याने त्यांनी इतर ठिकाणांप्रमाणेच खडकीतील महिलांवर अत्याचार केले नाहीत. लष्कराने

सामोपचाराने धोरण स्वीकारून कासाबाई,शिंदे अहिल्याबाई नागपुरे,यांच्यासह ३५ पुरुषांना घेवून लष्कर खडकीतून परत गेले. परंतु दोघींनाही लष्कराने भावी संकट ओळखून रस्त्यातून मध्येच गावात परत जाऊ दिले. त्या दोघीही सुखरूप खडकीत परत आल्या.

निष्कर्ष

१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रेरणेने महिलांनी आपल्या प्राणाची,कुटुंबाची पर्वा न करता स्वातंत्र्याच्या होमकुंडात उडी घेतली.

२) १९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनात आष्टिचा स्वातंत्र्यसंग्राम संपूर्ण देशभर गाजला. तो खऱ्या अर्थाने खडकीच्या कर्तबगार महिला मुळे, त्यांच्या कर्तबगारीला तोड नाही.

३) आष्टी च्या स्वातंत्र्यसंग्रामात खडकी गावातील महिलांच्या कर्तृत्वामुळे तेथून काही काळाकरिता ब्रिटिश राजवट समाप्त करण्यात यश मिळाले.

५) स्त्री ही वेळप्रसंगी दुर्गा व कालीचे रूप धारण करूण अशक्यप्राय कार्यही करू शकते हे खडकीच्या महिलांनी आपल्या यशस्वी कर्तुत्वाने यावेळी जगाला दाखवून दिले.

5) भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील खडकीच्या महिलांचे योगदान भारताच्या इतिहासात अजरामर राहील.

संदर्भ ग्रंथ सूची

वक्काणी, डॉ.नि.आ - आधुनिक विदर्भाचा इतिहास.

कोलारकर, डॉ.श.गो.- आधुनिक विदर्भाचा इतिहास.

कडवे, प्रा रघुनाथ- आष्टीचा स्वातंत्र्यसंग्राम.

कडवे, प्रा रघुनाथ - चिमूर क्रांती संग्राम.

दैनिक वृत्तपत्र लोकमत - ९ ऑगस्ट २०१२.

पाठक,डॉ. दमयंती - भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात वैदर्भीय महिलांचे योगदान.